# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०९/१२/२०२४ अनु.क्र.२२३

(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### बदली

**१.पोआअ/आस्था-१/प्रतिनियुक्ती परत/पोहवा-यादव/९४२१/२०२४ अमरावती शहर दिनांक १८/११/२०२४**

**संदर्भ :-** MINISTRY OF EXTERNAL AFFAIRS {BUREAU OF SECURITY -II} NEW DHLHI यांचे पत्र क्र.Q/BOS-II/V-१५४/२०२१-२८२ Date:-०६/११/२०२४

**विषय :-** प्रतिनियुक्तीवरुन मुळ घटकात परत आल्या बाबत. पोहवा/विशाल अ.यादव

### आदेश

उपरोक्त संदर्भांकीत आदेशान्वये पोलीस नाईक /विशाल अ. यादव हे दिनांक १९/१२/२०१९ पासुन प्रतिनियुक्तीवर विदेश मंत्रालय नवी दिल्ली येथे कार्यरत होते त्यांना वरील संदर्भीय आदेशान्वये त्यांचे मुळ घटक पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर परत पाठविण्यात आल्याने ते दिनांक ०६/११/२०२४ रोजी त्यांना पोलीस आयुक्त,अमरावती शहर आस्थापनेवर हजर होणेकरीता कार्यमुक्त केले आहे.

पोलीस हवालदार विशाल अं. यादव यांना दिनांक ०८/११/२०२४ म.पुर्व कर्तव्यावर हजर करुन घेवुन आस्थापनेवरील रिक्त **बक्कल नंबर १७३१** हा देण्यात येत असुन त्यांची नेमणुक पो.स्टे.सायबर अमरावती शहर येथे करण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/अंतिम आदेशतामील/पो.नि. जाधव+१/१०२१५/२०२४, अम. दि.२८/११/२०२४**

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेक्रं. पोमसं/११/२२/६- कसुरी ञ्‍ पोनि जाधव व इतर ०५/७४/२०२४ दि.-

**विषय :-** अंतिम आदेशतामीलकरणे बाबत.

**००-००**

उपरोक्त संदर्भान्कीत विषयाचे अनुषंगाने १) श्रीगोरखनाथ रामनाथ जाधव, पोलीस निरीक्षक २) पोशि/१६६० सागर बाळकृष्ण गोगटे, हे पोलीसस्टेशन वलगाव येथेकार्यरत असतांना केलेल्या कसूरीबाबत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून अंतिम शिक्षेचे आदेश या कार्यालयात प्राप्त झाले असूनसदर आदेशतामील करुन संबंधिदाची दुय्यम प्रतिवर दिनांकिंत स्वाक्षरी घेवून

सदरची दुय्यम प्रत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादरकरण्याकरिता कळविण्यांत आले आहे.

तरी अंतिम आदेशाच्या दोन प्रति आपणाकडे या पत्रासोबत जोडून पाठविण्यांत येत असून एक प्रत संबंधितास अदा करुन व दुय्यम प्रतिवर १) श्रीगोरखनाथ रामनाथ जाधव, पोलीस निरीक्षक २) पोशि/१६६० सागर बाळकृष्ण गोगटे, यांची दिनांकासहसाक्षरी घेवून सदरची दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयाससादर करावी.

**२.पो.आ.अ/विचौ.-१/निलंबन/ए.सी.बी./पोशि-५९१ सतिश सावरकर + १/१०२८८/२०२४ अम.शहर दिनांक - ३०/११/२०२४**

## <u>निलंबन आदेश</u>

१. ज्या अर्थीतुम्ही१) पोशि/५९१ सतीश सुभाष सावरकर, २) पोशि/१७८० अनिरुध्द नामदेवराव भिमकर, दोन्ही नेमणूक पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा अमरावती शहरहे येथे नेमणूकीस असून दिनांक २९/११/२०२४ रोजी तुमचे विरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा, अमरावती शहर येथे अप नं. १००३/२४, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखलकरण्यांत आला असून तुम्हाला दिनांक २९/११/२०२४ रोजी २२.०७ वा. अटक करण्यांतआलेली आहे.

२. तुम्ही स्वत:चा आर्थिक लाभ व्हावा याकरीता आपल्या लोकसेवक यापदाचा दुरुपयोग करुन कायदेशिर मोबदल्या शिवाय प्रलोभन म्हणुन तक्रारदारास लाचेची मागणी केली. लाचलुचपत व नैतीक अध:पतन कसुरीची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे. तुम्ही पोलीस विभागात जबाबदार पोलीस अंमलदार या पदावर कार्यरत असूनतुम्हासकायद्याचे परिपुर्ण ज्ञान असून सुध्दा तुमच्या गंभीर स्वरुपाच्या गैरवर्तणाच्या कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा जनसामान्य मानसात मलीन झाली आहे.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीसकायदा १९५१ मधील कलम २५ आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदीनुसारगुन्हा दाखल झाल्याचे तारखे पासुन म्हणजेच दिनांक २९/११/२०२४ पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहेकी, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८ (एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेकी, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतीलतो पर्यंत १) पोशि/५९१ सतीश सुभाष सावरकर, २) पोशि/१७८० अनिरुध्द नामदेवराव भिमकर, यांचे मुख्यालय पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे राहील. निलंबन काळाततुम्हाला मुख्यालयातहजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच तुम्हाला पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालयसोडता येणार नाही. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय तुम्ही मुख्यालय सोडल्यास ती तुमची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस तुम्ही

पात्र ठराल, तसेच मुख्यालयीहजर नसल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा निर्वाह भत्ता गमावल्यास तुम्ही जबाबदार राहाल.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत तुम्हांस कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही. खाजगी उद्योग अथवा नोकरी केली नसल्याचे प्रमाणपत्र महिना पूर्ण झाल्या नंतर या कार्यालयाससादर करावे लागेल. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योगकेल्याचे आढळुन आल्यास तुमच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

**३.पोआअ/वि.चौ-१/निलंबन मुक्त/पोना/१०५९ सागर निचळे/१०५३३/२०२४ अम.शहर दि.०६/१२/२०२४**

## निलंबन मुक्त आदेश

खालील नमुद पोलीसकर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात आलेहोते. सदर अमंलदारांच्या निलंबन प्रकरणाचे आम्ही पुनर्विलोकन करुन त्यांना कर्तव्यावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन निलंबनातुन मुक्तकरण्यांत येवून सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे त्यांना निलंबनातुन मुक्त केल्या नंतर त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणेकरण्यात येत आहे.

| अ.क्रं | निलंबित कर्मचा-यांचे नांव व ब.नं. | निलंबन तारीख | निलंबनातील मुख्यालय | निलंबनातुन मुक्तकेल्यानंतर नेणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पोना/१०५९ सागर निचळे | १७/०५/२०२४ | पो.मु., अम. शहर | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

तसेच नमुद पोलीसकर्मचारी यांचा निलंबनाबाबत आढावा बैठकी समितीसमोर घेण्यात आलेल्या आढावा बैठकी मधील निर्णयानुसारत्यांची निलंबनातून मुक्तताकरण्यात आलेली असून मुक्तताही पूर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असुनसदर प्रकरणीत्यांचे कसुरीबाबत प्राथमिक चौकशी/विभागीय चौकशी पुर्णझाल्यानंतरचत्यांचे शिक्षेबाबत अंतिम निर्णयाचे अधिन राहून निलंबन कालावधी संबंधी निर्णया बाबचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.

**४.पोआअ/विचौ/निलंबन कालावधी/निर्वाह भत्ता/१०५३६/२०२४ अमरावती शहर दि. ०६/१२/२०२४**

## आदेश

खालील नमुद निलंबीत अधिकारी व कर्मचारी यांना निलंबनामध्ये मुख्यालयी उपस्थित राहून दैनंदिनहजेरी लावण्याचे निर्बंध निलंबन आदेशामध्ये घालण्यात आलेहोते. तरीसुध्दा निलंबीत अधिकारी व कर्मचारीहे दैनंदिनहजेरी न लावता व वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता परस्पर त्यांच्या नावासमोर दर्शविलेले दिवस गैरहजर राहील्यामुळेत्यांनी निलंबन आदेशात निर्धारीत केलेल्या शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांचा निलंबनाच्या मुख्यालयीहजर असलेल्या दिवसाचा निर्वाह भत्ता अ.क्रं. १ यांना म.ना.से. (निलंबन, बडतर्फी इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) (ए) तरतूदीनूसार मंजूरकरण्यांत येत आहेतसेच अ.क्रं. २ मधील निलंबित अंमलदारहे निलंबनाधिन काळात दिनांक ०२/०६/२०२३ पासून मुख्यालयीगैरहजर आहे.

त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) अन्वये कोणतेही प्रदानकेले जाणार नाही त्यांचा निलंबन कालावधी मधील निर्वाह भत्त्यावरील हक्कत्यांनी गमावलेला आहे.

| **अ. क्र.** | **पो.अधि./अंमलदार यांचे नाव पदनाम/ ब.नं.** | **निलंबन दिनांक** | **कालावधी** | **निलंबित मुख्यालयीहजर/गैरहजर माहिती** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **हजर दिवस** | **गैरहजर दिवस** | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोना/१०५९ सागर निचळे, नेमणूक पो.स्टे. राजापेठ | १७/५/२०२४ | दि.१/११/२०२४ ते दि.३०/११/२०२४ | २४ | ०६ | -- |
| २ | पोशि/१६९१ विशाल गजभिये, नेमणूक पो.स्टे. नागपूरीगेट | ०२/०६/२०२३ | दि.१/११/२०२४ ते दि.३०/११/२०२४ | -- | ३० | -- |

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१. पोआअ/लेखा/मोटार सायकल/व्याज कपात/१०४१५/२०२४ अमरावती शहर दिनांक ०३/१२/२०२४**

### आदेश

पोउपनि/५८१ अनिल केशवराव वानखडे, नेमणूक नियत्रंण कक्ष यांना उपलब्ध अभिलेखानुसार वित्तीय वर्षे सन २०२१-२०२२ मध्ये या कार्यालयाचे आदेश क्रं. पोआअ/लेखाशाखा/मोटार सायकल अग्रीम/१००/२०२२, दिनांक २५/०२/२०२२ अन्वये रुपये ७०,०००/- इतके मोटार सायकल अग्रीम मंजूर करण्यात आले होते. सदर अग्रीमाची मुद्दल त्यांचे वेतनामधुन नियमितपणे रुपये २८०० X २५ प्रमाणे (माहे २०२२ पासुन डिसेंबर २०२४ पर्यत) नियमीत भरण्यात आले आहे.

सदर पोलीस अंमलदार यांचे मोटार सायकल अग्रीम रुपये ७०,०००/- वरील व्याजाची गणना केली असता ती **रुपये ७,२८६/- (अक्षरी रुपये सात हजार दोनश छाअंशी फक्त)** वसुल करणे बाकी असल्याने सदरची रक्कम त्यांचे **माहे डिसेबंर/२०२४ चे वेतनामधुन** एकरकमी वसुल करण्यात यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस